# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र./फॅक्सक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gug.registrar@gmail.com/ registrar@unigug.ac.in

जा.क्र. /गों.वि.ग/कु.स.का./ ८००५ /२०२६ दि.१३/१०/२०२६

### परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालये

मा. सर्व विभागप्रमुख,
प. शै. वि.गोंडवाना विद्यापीठ

विषय : गोंडवाना विद्यापीठ आणि विद्यापीठाअंतर्गत सर्व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी कार्यन्वित ' स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना 'त्वरित लागू 'करण्याबाबत

महोदय,

उपरोक्त विषयांबाबत शासन निर्णय दि. २५/२/२०२६ नुसार गोंडवाना विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी'स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजना' अंतर्गत असलेला विद्यार्थी वैयक्तिक अपघात विमा ( Personal Accident Insurance) अनिवार्य असून ही योजना लागू करण्याबाबत सूचना देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रसार व प्रचारार्थ संलग्नित महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर सदरहू योजनेचा तपशील उपलब्ध करून देण्यात यावा.

सदर योजनेसाठी svyuvasuraksha.org हे संकेतस्थळ विकसित करण्यात आलेले आहे. त्यावर संपर्कासाठी हेल्पलाईन नंबर तसेच ई-मेल आयडी उपलब्ध करून दिलेला आहे. प्रस्तुत योजना महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर सर्व विद्यार्थ्यांना अवगत करून देऊन जास्तीत जास्त विदयार्थी या योजनेचा लाभ घेतील, या बाबत दक्षता घेण्यात यावी.

त्याबाबतचा शासन निर्णय आपणास संलग्नित करून देत आहे, याची नोंद घ्यावी. त्यानंतर जास्तीत जास्त विदयार्थ्यांची नोंदणी करून, नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांचा अहवाल दि. 16/10/2026 पर्यंत विद्यापीठाला सादर करावा आणि सदरहू योजनेचा लाभ घ्यावा अशी सूचना देण्यात येत आहे.

(डॉ. अनिल हिरेखण)
कुलसचिव

**प्रतिलिपी : -**

१. मा. कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.
२. मा. प्र-कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.

Scanned with OKEN Scanner